| Publication | Edition | Date | Subject |
|---|---|---|---|
| Janpravas | Pune | 31/08/2018 | LIFFI 2018 |

# लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे ट्रीओसे प्लाझा येथे आयोजन

**पुणे :** विविध चित्रपटांच्या माध्यमातून रसिकांना मंत्रमुग्ध करण्यासाठी तिसरा लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ७ ते ९ सप्टेंबर २०१८ दरम्यान लोणावळा येथील ट्रीओसे प्लाझा येथे आयोजित करण्यात येत आहे. अल्ट्रा मीडिया आणि इंटरटेमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुशील कुमार अगरवाल हे या महोत्सवाचे मुख्य आश्रयदाते असून १८ चित्रपट, २ कुशल चित्रपट निर्मात्यांच्या चर्चासत्रासह ३ कार्यशाळा ही या महोत्सवाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. याचबरोबर भारतीय चित्रपटसृष्टीत बहुमोल योगदान देणारे प्रथितयश दिग्दर्शक बिमल रॉय यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी त्यांच्या सहा चित्रपटांचे आणि त्यांच्यावरील लघुपटाचे सादरीकरण होणार आहे.